"गोड मुलांनो - बेहदची स्कॉलरशिप घ्यायची असेल तर अभ्यास करा - एका बाबांव्यतिरिक्त दुसऱ्या कशाचीही आठवण येऊ नये"

प्रश्न:- बाबांचा बनल्यावर देखील जर खुशी राहत नसेल तर त्याचे कारण काय आहे?

उत्तर:- १) बुद्धीमध्ये पूर्ण ज्ञान राहत नाही. २) बाबांची यथार्थ रीतीने आठवण करत नाहीत. आठवण न केल्यामुळे माया दगा देते त्यामुळे खुशी राहत नाही. तुम्हा मुलांच्या बुद्धीमध्ये नशा असावा की, 'बाबा आम्हाला विश्वाचा मालक बनवितात', तेव्हाच सदैव उल्हास आणि खुशी राहील. बाबांचा जो वारसा आहे - पवित्रता, सुख आणि शांती, यामध्ये फुल बना (संपन्न बना) तेव्हाच खुशी राहील.

ओम् शांती. 'ओम् शांती'चा अर्थ तर मुलांना चांगलाच माहित आहे - मी आत्मा, हे माझे शरीर. हे नीट लक्षात ठेवा. भगवान अर्थात आत्म्यांचे पिता आम्हाला शिकवतात, असे कधी ऐकले आहे का? ते (दुनियावाले) तर समजतात की श्रीकृष्ण शिकवतात, परंतु त्याचे तर नाव-रूप आहे ना. हे शिकवणारे तर आहेत निराकार बाबा. आत्मा ऐकते आणि परमात्मा ऐकवतात. ही नवीन गोष्ट आहे ना. विनाश तर होणारच आहे ना. एक आहेत - विनाश काले विपरीत-बुद्धी आणि दुसरे आहेत - विनाश काले प्रीत-बुद्धी. आधी तुम्ही देखील म्हणत होता ईश्वर सर्वव्यापी आहे, दगड-धोंड्यामध्ये आहे. या सर्व गोष्टींना व्यवस्थित समजून घ्यायचे आहे. हे तर समजावून सांगितले आहे आत्मा अविनाशी आहे, शरीर विनाशी आहे. आत्मा कधी छोटी-मोठी होत नाही. ती आहे अतिशय छोटी आत्मा, इतकी छोटी आत्माच ८४ जन्म घेऊन सर्व पार्ट बजावते. आत्मा शरीराला चालवते. सर्वोच्च बाबा शिकवतात तर जरूर पद देखील उच्च मिळणार. आत्माच शिकून पद प्राप्त करते. आत्मा काही या डोळ्यांनी दिसत नाही. खूप प्रयत्न करतात की बघावे आत्मा कशी येते, कुठून निघून जाते? परंतु दिसत नाही. आणि जरी कोणी पाहिली तरी देखील समजू शकणार नाही. हे तर तुम्ही समजता की आत्माच शरीरामध्ये निवास करते. आत्मा वेगळी आहे, जीव (देह) वेगळा आहे. आत्मा लहान-मोठी होत नाही. देह लहानाचा मोठा होतो. आत्माच पतित आणि पावन बनते. आत्माच बाबांना बोलावते - 'हे पतित आत्म्यांना पावन बनविणारे बाबा, या'. हे देखील समजावून सांगितले आहे - सर्व आत्मे आहेत ब्राईड्स (सीता), आणि ते (बाबा) आहेत राम, एक ब्राईडग्रुम. ते लोक मग सर्वांना ब्राईडग्रुम म्हणतात. आता ब्राईडग्रुम सर्वांमध्ये प्रवेश करेल, असे तर होऊ शकत नाही. हे बुद्धीमध्ये उलटे ज्ञान असल्यामुळेच खाली कोसळत आले आहेत (पतन झाले आहे) कारण खूप निंदा करतात, पाप करतात, बदनामी करतात. बाबांची तर खूप जास्त निंदा केली आहे. मुले कधी पित्याची निंदा करतील काय! परंतु आज-काल क्रोध आला की मग वडिलांना देखील शिव्या देऊ लागतात. हे तर आहेत बेहदचे बाबा. आत्मा बेहदच्या बाबांची निंदा करते - बाबा तुम्ही कच्छ-मच्छ अवतार आहात. श्रीकृष्णाची सुद्धा निंदा केली आहे - राण्यांना पळविले, असे केले, लोणी चोरले. आता लोणी इत्यादी चोरण्याची त्यांना काय गरज होती. किती तमोप्रधान-बुद्धी बनले आहेत. बाबा म्हणतात - 'मी येऊन तुम्हाला पावन बनवण्यासाठी अतिशय सोपी युक्ती सांगतो'. बाबाच पतित-पावन सर्वशक्तिमान ऑथॉरिटी आहेत. जसे साधू-संत इत्यादी जे पण आहेत, त्यांना शास्त्रांची ऑथॉरिटी म्हणतात. शंकराचार्यांना देखील वेद-शास्त्रे इत्यादींची ऑथॉरिटी म्हटले जाईल, त्यांचा रुबाब किती असतो. शिवाचार्यांचा (शिवबाबांचा) तर कोणताही रुबाब नाही, त्यांच्यासोबत कोणती फलटण नाही. हे तर बसून सर्व वेद-शास्त्रांचे सार ऐकवितात. जर शिवबाबांनी रुबाब दाखवला तर त्या आधी यांचा (ब्रह्मा बाबांचा) सुद्धा रुबाब पाहिजे. परंतु नाही. बाबा म्हणतात - मी तर तुम्हा मुलांचा सेवक आहे. बाबा यांच्यामध्ये प्रवेश करून मुलांना समजावून सांगतात की 'मुलांनो, तुम्ही पतित बनले आहात. तुम्ही पावन बनून पुन्हा ८४ जन्मानंतर पतित बनले आहात. यांचीच हिस्ट्री-जिओग्राफी पुन्हा रिपीट होणार. यांनीच ८४ जन्म भोगले आहेत. त्यांनाच पुन्हा सतोप्रधान बनण्याची युक्ती सांगतो'. बाबाच सर्वशक्तिमान आहेत. ब्रम्हाद्वारे सर्व वेद-शास्त्रांचे सार समजावून सांगतात. चित्रांमध्ये ब्रह्माच्या हातात शास्त्र दाखवतात. परंतु खरेतर शास्त्र इत्यादींची गोष्टच नाही. ना बाबांकडे शास्त्र आहेत, ना यांच्याकडे (ब्रह्मा बाबांकडे), ना तुमच्याकडे शास्त्र आहेत. हे तर तुम्हाला सतत नवीन-नवीन गोष्टी ऐकवतात. हे तर जाणता की सर्व शास्त्रे भक्तीमार्गाची आहेत. मी काही शास्त्र थोडेच ऐकवतो. मी तर तुम्हाला मुखावाटे ऐकवतो. तुम्हाला राजयोग शिकवतो, ज्याचे मग भक्तीमार्गामध्ये 'गीता' नाव ठेवले आहे. माझ्याकडे

किंवा तुमच्याकडे कोणती गीता इत्यादी आहे काय? हे तर शिक्षण आहे. शिक्षणामध्ये अध्याय, श्लोक इत्यादी थोडेच असतात. मी तुम्हा मुलांना शिकवतो, हुबेहूब कल्प-कल्प असेच शिकवत राहीन. किती सोपे करून समजावून सांगतो - 'स्वतःला आत्मा समजा. या शरीराची तर माती होते. आत्मा अविनाशी आहे, शरीर तर वारंवार जाळले जाते. आत्मा एक शरीर सोडून दुसरे घेते'.

बाबा म्हणतात - 'मी तर एकदाच येतो. शिवरात्री देखील साजरी करतात. खरे पाहता असली पाहिजे शिवजयंती. परंतु 'जयंती' म्हटले तर मातेच्या गर्भातून जन्म घेणे झाले, त्यामुळे याला शिवरात्री म्हणतात. द्वापर-कलियुगाच्या रात्रीमध्ये मला शोधतात. म्हणतात - सर्वव्यापी आहे. तर तुझ्यामध्ये देखील आहे ना, मग इतके दुःख का भोगतोस! एकदम जसे देवतांपासून आसुरी संप्रदायाचे बनतात. देवता कधी दारू पितात काय? त्याच आत्म्यांची पुन्हा अधोगती झाली आहे त्यामुळे दारू इत्यादी प्यायला लागले आहेत. बाबा म्हणतात - 'आता या जुन्या दुनियेचा विनाश देखील जरूर होणार आहे. जुन्या दुनियेमध्ये आहेत अनेक धर्म, नवीन दुनियेमध्ये आहे एक धर्म. एकापासून अनेक धर्म झाले आहेत परत एक जरूर होणार आहे. मनुष्य तर म्हणतात कलियुगाला अजून ४० हजार वर्षे बाकी आहेत, याला म्हटले जाते घोर अंधार. 'ज्ञान सूर्य प्रगटा, अज्ञान अन्धेर विनाश'. लोकांमध्ये खूप अज्ञान आहे. ज्ञान सूर्य, ज्ञानसागर बाबा येतात तर तुमचे भक्तीमार्गातील अज्ञान नष्ट होते. तुम्ही बाबांची आठवण करता-करता पवित्र बनता, अशुद्धता निघून जाते. हा आहे योग-अग्नी. काम-अग्नी काळे (पतित) बनवतो. योग-अग्नी अर्थात शिवबाबांची आठवण गोरे (पावन) बनवतो. श्रीकृष्णाचे नाव देखील ठेवले आहे - श्याम-सुंदर. परंतु अर्थ थोडाच समजतात. बाबा येऊन अर्थ समजावून सांगतात. सर्वप्रथम सतयुगामध्ये किती सुंदर आहेत. आत्मा पवित्र सुंदर आहे तर शरीर देखील पवित्र सुंदर घेते. तिथे किती धन-दौलत सर्वकाही नवीन असते. नवीन धरणी मग जुनी होते. आता या जुन्या दुनियेचा विनाश जरूर होणार आहे. जोरदार तयारी सुरु आहे. भारतवासी इतके समजत नाहीत, जितके ते समजतात की आपण आपल्याच कुळाचा विनाश करत आहोत. कोणी प्रेरक आहे. विज्ञानाच्या आधारे आपण आपलाच विनाश घडवून आणतो. हे देखील समजतात की क्राईस्टच्या ३००० वर्षांपूर्वी स्वर्ग होता. या देवी-देवतांचे राज्य होते. भारतच प्राचीन होता. या राजयोगाद्वारे असे लक्ष्मी-नारायण बनले होते. तो राजयोग तर बाबाच शिकवू शकतात. संन्यासी शिकवू शकत नाहीत. आजकाल किती फसवणूक होत आहे. परदेशामध्ये जाऊन म्हणतात - आम्ही भारताचा प्राचीन योग शिकवतो. आणि मग म्हणतात - अंडे खा, दारू इत्यादी भले प्या, काहीही करा. आता ते कसे राजयोग शिकवू शकतील, मनुष्याला देवता कसे बनवू शकतील. बाबा समजावून सांगत आहेत - 'आत्मा किती श्रेष्ठ आहे मग पुनर्जन्म घेत-घेत सतोप्रधानापासून तमोप्रधान बनते. आता तुम्ही पुन्हा स्वर्गाची स्थापना करत आहात. तिथे दुसरा कोणताही धर्म असतच नाही'. आता बाबा म्हणतात - नरकाचा विनाश तर जरूर होणार आहे. इथपर्यंत जे आले आहेत ते मग स्वर्गामध्ये जरूर जाणार. शिवबाबांचे थोडे जरी ज्ञान ऐकले तरी स्वर्गामध्ये जरूर जातील. मग जितके शिकतील, बाबांची आठवण करतील तितके उच्च पद प्राप्त करतील. आता तर सर्वांसाठीच विनाशाची वेळ आहे. विनाशकाले प्रीतबुद्धी जे आहेत, बाबांव्यतिरिक्त इतर कोणाचीही आठवण करत नाहीत, तेच उच्च पद प्राप्त करतात. याला म्हटले जाते बेहदची स्कॉलरशिप, यामध्ये तर स्पर्धा केली पाहिजे. ही आहे ईश्वरीय लॉटरी. एक तर आठवण करायची आहे, दुसरे दैवीगुण धारण करायचे आहेत आणि राजा-राणी बनायचे असेल तर प्रजा देखील बनवायची आहे. कोणी भरपूर प्रजा बनवतात, कोणी थोडी. प्रजा बनते सेवेद्वारे. म्युझियम, प्रदर्शनी इत्यादीमध्ये पुष्कळ प्रजा बनते. यावेळी तुम्ही शिकत आहात आणि नंतर मग सूर्यवंशी-चंद्रवंशी डिनायस्टी (घराण्यामध्ये) जाल. हे आहे तुम्हा ब्राह्मणांचे कुळ. बाबा ब्राह्मण कुळाला ॲडॉप्ट करून त्यांना शिकवतात. बाबा म्हणतात - 'मी एक कुळ आणि दोन घराणी बनवतो. सूर्यवंशी महाराजा-महाराणी, चंद्रवंशी राजा-राणी. यांना म्हणणार डबल सिरताज (डबल मुकुटधारी) नंतर जेव्हा राजे विकारी बनतात तेव्हा त्यांना लाइटचा ताज (पवित्रतेचा मुकुट) नसतो. त्या डबल मुकुटधारींची मंदिरे बनवून त्यांची पूजा करतात. पवित्र असणाऱ्यांसमोर डोके टेकवतात. सतयुगामध्ये या गोष्टी असत नाहीत. ती आहेच पावन दुनिया, तिथे पतित असत नाहीत. त्याला म्हटले जाते सुखधाम, व्हाइसलेस वर्ल्ड (निर्विकारी दुनिया). याला म्हटले जाते विशश वर्ल्ड (विकारी दुनिया). एकही पावन नाही. संन्यासी घरदार सोडून पळून जातात, राजा गोपीचंदाचे देखील उदाहरण आहे. तुम्ही जाणता - कोणताही मनुष्य एकमेकांना गती-सद्गती देऊ शकत नाही. सर्वांचा सद्गती दाता मीच आहे. मी येऊन सर्वांना पावन बनवतो. पहिले तर तुम्ही पवित्र बनून शांतीधाममध्ये जाल आणि दुसरे पवित्र बनून सुखधाममध्ये जाल. हे आहे अपवित्र दुःखधाम. सतयुगामध्ये रोगराई इत्यादी काहीच असत नाही. तुम्ही त्या सुखधामाचे मालक होता

नंतर मग रावणराज्यामध्ये दुःखधामाचे मालक बनले आहात. बाबा म्हणतात - ‘कल्प-कल्प तुम्ही माझ्या श्रीमतावर स्वर्ग स्थापन करता. नवीन दुनियेचे राज्य घेता आणि नंतर पतित नरकवासी बनता’. देवताच मग विकारी बनतात, वाम मार्गामध्ये जातात.

गोड-गोड मुलांना बाबांनी येऊन परिचय दिला आहे कि, ‘मी एकदाच पुरुषोत्तम संगमयुगावर येतो. मी युगे-युगे तर येतच नाही. कल्पाच्या संगमयुगावर येतो, युगे-युगे नाही’. कल्पाच्या संगमावर का येतो? कारण नरकाला स्वर्ग बनवितो. दर ५ हजार वर्षानंतर येतो. बरीच मुले लिहितात - ‘बाबा, आम्हाला तो आनंद राहत नाही, उल्हास राहत नाही’. अरे, बाबा तुम्हाला विश्वाचा मालक बनवतात, अशा बाबांची आठवण करून तुम्हाला आनंद होत नाही! तुम्ही निरंतर आठवण करत नाही त्यामुळे तो आनंद टिकून राहत नाही. पतीची आठवण करताना आनंद होतो, जो पतित बनवितो आणि बाबा, जे डबल सिरताज बनवतात, त्यांची आठवण करून आनंद होत नाही! बाबांची मुले बनले आहात तरीदेखील म्हणता कि आनंद होत नाही! बुद्धीमध्ये पूर्ण ज्ञान नाहीये. आठवण करत नाही म्हणून माया दगा देते. मुलांना किती चांगल्या रीतीने समजावून सांगतात. कल्प-कल्प समजावून सांगतात. आत्मे जे पत्थर-बुद्धी बनले आहेत, त्यांना पारस-बुद्धी बनवतो. नॉलेजफूल बाबाच येऊन नॉलेज देतात. ते प्रत्येक गोष्टीमध्ये फुल (संपन्न) आहेत. प्युरिटीमध्ये फुल, प्रेमामध्ये फुल. ज्ञानाचा सागर, सुखाचा सागर, प्रेमाचा सागर आहेत ना. अशा बाबांकडून तुम्हाला हा वारसा मिळतो. असे बनण्यासाठीच तुम्ही येता. बाकी ते सत्संग इत्यादी तर सर्व आहेत भक्ती मार्गाचे. त्यामध्ये एम-ऑब्जेक्ट काहीच नाही. याला तर ‘गीता पाठशाळा’ म्हटले जाते, ‘वेद पाठशाळा’ नाही. गीतेद्वारे नरापासून नारायण बनता. जरूर बाबाच बनवतील ना. मनुष्य, मनुष्याला देवता बनवू शकत नाही. बाबा वारंवार मुलांना समजावून सांगतात - ‘मुलांनो, स्वतःला आत्मा समजा. तुम्ही काही शरीर थोडेच आहात’. आत्मा म्हणते, मी एक शरीर सोडून दुसरे घेते’. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांशः-

1. १) जसे शिवबाबांचा कोणताही दिखावा नाही, सेवक बनून मुलांना शिकविण्यासाठी आले आहेत, असे बाप समान ऑथॉरिटी असताना देखील निरहंकारी रहायचे आहे.
2. २) विनाशाच्या वेळी ईश्वरीय लॉटरी घेण्यासाठी प्रीत-बुद्धी बनून आठवणीमध्ये राहण्याची आणि दैवी गुण धारण करण्याची स्पर्धा करायची आहे.

वरदानः- शुद्ध संकल्पांच्या घेरावाद्वारे सेफ्टीचा अनुभव करणारे आणि करविणारे शक्तिशाली आत्मा भव
शक्तिशाली आत्मा ती आहे जी दृढतेच्या शक्तीद्वारे सेकंदा पेक्षा देखील कमी वेळामध्ये व्यर्थला समाप्त करेल. शुद्ध संकल्पांच्या शक्तीला ओळखा, एक शुद्ध आणि शक्तिशाली संकल्प खूप कमाल करू शकतो. फक्त कोणताही दृढ संकल्प करा तर दृढता यशाला घेऊन येईल. सर्वांसाठी शुद्ध संकल्पांचा वेढा, घेराव असा घाला जेणेकरून थोडाजरी कोणी कमजोर असेल, तर त्याच्यासाठी देखील हा घेराव एक छत्रछाया बनेल, सेफ्टीचे साधन किंवा किल्ला बनेल.

बोधवाक्यः- सर्वात श्रेष्ठ भाग्य त्यांचे आहे ज्यांना डायरेक्ट भगवंताकडून पालना, शिक्षण आणि श्रेष्ठ जीवनासाठी श्रीमत मिळते.

||| ओम शांती |||